**<u>नि.फौ.ख.क्र.१२९/२०२२</u>**
शासन–वि–योगेश पवार
**नि.क्र.३२.**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ४ यांची जबानी</u>**

मी याद्वारे सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,

| | | |
|---|---|---|
| नाव | – | गणेश सुरेश तारळकर, |
| वय | – | ४२ वर्षे, |
| व्यवसाय | – | पोलीस हवालदार ब. क. ९३९३ |
| नेमणूक | – | पोलीस मुख्यालय, शिवाजीनगर, जि. पुणे. |

**<u>सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस. पी. आंधळे यांच्यामार्फत शपथेवर सुरुः–</u>**

१. दि. १४.०४.२०२१ रोजी मी यवत पोलीस स्टेशन येथे पोलीस नाईक म्हणुन नेमणुकीस होतो. सदर दिवशी पोलिस निरीक्षक पाटील साहेब यांनी पुणे सोलापूर रोडवर अवैधरित्या वाळू वाहतूक करणा–या गाडयांवर कारवाई करण्यास सांगितले. त्यासाठी आम्ही सकाळी ६ वाजता मांडगाव फाटा शिवनेरी हॉटेलजवळ गेलो. ६–६.१५ च्या दरम्यान सोलापूर बाजूने एक ट्रक येताना दिसून आला. त्याच्यावर संशय आल्याने आम्ही त्याला बाजूला केले. त्या ट्रकचा नंबर एम. एच. १२ के. पी. २०२० असा होता. त्याच्या चालकाचे नाव योगेश सुभाष पवार असे होते. वाहनाची तपासणी केली असता त्याच्या हौद्यामध्ये अंदाजे तीन ब्रास वाळू मिळून आली. चालकाकडे वाळूबाबत परवाना नव्हता आणि त्याने ती गाडी नामदेव किसन पवार यांच्याकडून नोटरीने खरेदी घेतल्याचे सांगितले. त्याच्याकडे नोटरीचे कागदपत्र मिळून आले. त्यानंतर गाडीचा दोन पंचांसमक्ष पंचनामा केला. आता मला दाखविण्यात आलेला जप्ती पंचनामा हा तोच आहे. त्यावर माझी व पंचांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.३३</u>** देण्यात येते. सदरचा जप्त वाहन आणि मुद्देमाल पोलिस स्टेशनला जमा करुन मुद्देमाल पावती फाडले. आता मला दाखविण्यात आलेला मुद्देमाल पावती तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.३४</u>** देण्यात येते. त्यानंतर माझ्यासोबत सहकारी पोलीस कॉन्स्टेबल दिपक यादव यांनी सरकारतर्फे फिर्याद दिली. सदर गुन्हा नोंद होऊन त्याचा तपासकाम माझ्याकडे देण्यात आला. माझ्या तपासाअंती आरोपी अटक करुन न्यायालयात हजर केले. आता मला दाखविण्यात आलेला अटक पंचनामा हा तोच आहे. त्यावर आरोपीची आणि पंच यांची सही आहे. त्यातील मजकुर खरा

व बरोबर आहे. त्यास **नि.३५** देण्यात येते. जप्त ट्रक न्यायालयाच्या आदेशाने मूळ मालक नामदेव किसन पवार यांना देण्यात आला. आता मला दाखविण्यात आलेला सुपूर्तनामा हा तोच आहे. त्यावर गाडीमालकाची आणि मुद्देमाल क्लार्क यांची सही आहे. त्यास ओळखीसाठी **आर्टीकल अ** देण्यात येते. अटक आरोपीला पाहिल्यास ओळखू शकतो. आरोपी आज न्यायालयात हजर नाही. आरोपींची गैरहजेरी त्यांची ओळख आव्हानित न करण्याच्या अटीवर माफ करण्यात आली आहे. माझ्या तपासकामात आरोपीविरुध्द पुरावा निष्पन्न झाल्यामुळे त्याच्याविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. व्ही. ए. माने यांच्यामार्फतः–**

२. हे म्हणणे खरे आहे की, कारवाईकरिता जाण्यापुर्वी स्टेशन डायरीला नोंद केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीकडे चौकशी करुन त्याने ज्याच्या मदतीने वाळू उपसा करुन चोरी केली त्याला या केसमध्ये आरोपी केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, पंचांना लेखी नोटीस दिली नव्हती. साक्षीदार म्हणतो, सोबत घेऊन गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, जप्त वाळूचे मोजमाप करण्याकरिता महसूल कार्यालयातील व्यक्तींना बोलावले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, ज्या ठिकाणाहून आरोपीने ती वाळू भरली होती त्या ठिकाणाचा जाऊन पंचनामा केला नाही. आरोपीने वाळू उपसा करतेवेळी प्रत्यक्षदर्शी साक्षीदार निष्पन्न करुन त्यांचे तपास टिपण नोंदविलेले नाही. माझ्या तपासकामात रस्त्यावरील सीसीटीव्ही फुटेज हस्तगत करुन सामील करुन घेतले नाही. हे म्हणणे खरे नाही की, वरिष्ठांच्या दबावामुळे सहका–यांचे खोटे जबाब नोंदवून खोटे दोषारोपपत्र दाखल करुन आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत. समक्ष

Sd/-

दिनांकः– ०१.०४.२०२६

**[ श्रीमती एस. ए. विराणी ]**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, दौंड, जि. पुणे.